# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

EISSN 2394 - 7640

Special Issue

Approved By UGC Journal No- 41120

IMPACT FACTOR - 5.98

UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019

**Volume-II, February 2019 (Special Issue)**

✤ EDITOR IN CHIEF ✤

**DR. M. RAGHIB DESHMUKH**

✤ GUEST EDITOR ✤

**DR. BALASAHEB JADHAV**

www.scholarsimpact.com

Organised by
**Department of Political Science**
M.S.P. Mandal's
**SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.**

| | | |
|---|---|---|
| 11. | भारतीय संसदीय लोकशाहीचा ऐतिहासीक आढावा<br><br>प्रा. डी. एन. रिठ | 42 – 45 |
| 12. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने आणि उपाययोजना<br><br>प्रा. अंभोरे ए. जी. | 46 – 49 |
| 13. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br><br>प्रा. रमेश एकनाथ भास्कर | 50 – 52 |
| 14. | भारतीय लोकशाही आणि सोशल मिडिया : आजचे वास्तव<br><br>प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके | 53 – 55 |
| 15. | भारतीय राज्यघटना आणि सामाजिक न्याय<br><br>प्रा. मधुकर विठ्ठल घावरे | 56 – 57 |
| 16. | दहशतवादाचा भारतीय लोकशाही वरील प्रभाव<br><br>प्रा. पवार एस. एस. | 58 – 61 |
| 17. | भारतीय लोकशाहीतील महिलांचे सबलीकरण<br><br>प्रा. डॉ. जे. एस. ढवळे | 62 – 64 |
| 18. | लोकशाही आणि सुशासन<br><br>प्रा. डॉ. मीरा विठ्ठलराव फड | 65 – 67 |
| 19. | पंचायतराज व्यवस्था आणि महिलांचा राजकीय सहभाग<br><br>डॉ. नवनाथ गोविंदराव आडकिणे | 68 – 71 |
| 20. | भारतीय लोकशाही जम्मु काश्मीर मधील दहशतवाद वाढण्यास कलम 370 होणारी मदत एक चिकित्सा<br><br>प्रा. संदीप भानुदास गवते, डॉ. एन. झेड. पाटील | 72 – 74 |

SPECIAL ISSUE Vol. II | Feb. 2019 | ISSN 2394-7632 | EISSN 2394-7640 (IMPACT FACTOR- 5.98)
SCHOLARS IMPACT An International Multidisciplinary Multilingual Refereed Journal
Shri Shivaji College, Parbhani 16th February 2019
National Conference

(11)

# भारतीय संसदीय लोकशाहीचा ऐतिहासीक आढावा

प्रा. डी.एन. रिठे
इतिहास विभाग,
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

प्रास्ताविक :

भारताच्या आजच्या राज्यघटनेचा उगम आणि विकास ब्रिटिशकाळातच झाला. सत्तेचे विभाजन व सत्ते विकेंद्रीकरण ही भारताच्या संसदीय संघ राज्याची दोन वैशिष्टये आहेत. ब्रिटिशांना भारतात लोकशाहीचा विकास करायचा नव्हता. परंतु इ.स.1858 चा उठाव व नंतर सुशिक्षीत भारतीयांची राजसत्तेत भारतीयांना सहभागी करुन घेण्याची मागणी यामुळे ब्रिटिश सरकारला टप्पा टप्प्याने भारतीयांना सत्तेत सहभागी करुन घ्यावे लागले. पर्यायाने भारतात संसदीय लोकशाहीचा विकास होत गेला.

संशोधनाची उद्दिष्टे :

1. इ.स. 1858 पासून भारतच्या राजकारणात कोणते घटनात्मक बदल झाले याचा अभ्यास करणे.
2. स्वातंत्र्यपुर्व काळातील ब्रिटिश सरकारने लागु केलेल्या कायद्याचा अभ्यास करणे.
3. भारतातील संसदीय लोकशाहीचा आढावा घेणे.

संशोधन पध्दती :

संशोधन लेखासाठी दुयम माहिती स्त्रोताचा अभ्यास करण्यात आलेला आहे. यात संदर्भ ग्रंथ, शोध प्रबंध इंटरनेट इ. स्त्रोताचा वापर केलेला आहे.

इ.स. 1858 व इ.स. 1861 चा कायदा :

भारतातील इ.स.1857 च्या उठावामुळे भारताचे प्रशासन ब्रिटिश पार्लमेंटने आपल्याकडे घेतले व 1858 च्या कायद्यानुसार भारताचा कारभार सांभाळण्यासाठी भारतमंत्री हे पद तयार करण्यात येऊन त्याच्या मदतीसाठी 15 सदस्यीय मंडळ तयार करण्यात आले. भारतातील सर्वोच्च सत्ता गव्हर्नर जनरलच्या हाती सोपविण्यात येऊन त्यास व्हॉईसराय हा किताब देण्यात आला. त्याचे केंद्रीय शासनाबरोबरच प्रांतावरील नियंत्रण ही मजबुत होते. सत्तेच्या केंद्रीकरणामुळे प्रांताचे अधिकार कमी करण्यात आले. भारत मंडळात एकही भारतीयांचा समावेश नसल्याने पुढे शासनामध्ये भारतीयांना प्रतिनिधित्व मिळावे या मागणीने जोर धरला.

इ.स. 1861 च्या भारतीय कौन्सील कायद्यानुसार व्हॉईसरायच्या कार्यकारी मंडळात कमीत कमी 6 व जास्तीत जास्त 12 अतिरिक्त सदस्याच्या नियुक्तीची तरतुद करण्यात आली. ह्याची नेमणुक व्हाईसराय करीत असे त्यातील किमान अर्धे सदस्य गैरसरकारी असत त्यांचा कार्यकाळ दोन वर्षाचा होता. गैरसरकारी सदस्य हे जमीनदार व व्यापारी वर्गातुन निवडले जाई ज्यांचा भारतीय जनतेशी किंवा भारत निर्माण होणाऱ्या राष्ट्रवादाशी काहीही संबंध नव्हता. या कायदेमंडळास प्रशासना संबंधीत किंवा आर्थिक बाबतीत प्रश्न वगैरे विचारण्याचा अधिकार नव्हता. अशा प्रकारे 1861 च्या कायद्यात भारतीयांना नाममात्र सदस्यत्व दिल्या गेले. परंतु अंतिम अधिकार हे व्हाईसरायच्या हाती होते.

इ.स.1892 चा भारतीय कौन्सील कायदा :

इ.स. 1861 मध्ये स्थापन झालेल्या कायदेमंडळातील गैरसरकारी सदस्य असून नसल्यासारखे होते. कारण ते जनतेचे प्रतिनिधित्व करत नव्हते. पुढे ब्रिटिश सरकारच्या धोरणामुळे इ.स. 1885 मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. तीने घटनात्मक मार्गाने सरकारवर दबाव टाकण्यात सुरुवात केली. काँग्रेसची मागणी होती की केंद्रीय व प्रांतीय कायदेमंडळात पुरेशा संख्येने निर्वाचीत सदस्य घेतले जावे, प्रशासनाच्या सर्वच विभागाच्या कार्यकारी मंडळाला प्रश्न विचारण्याचा अधिकार कायदेमंडळ सदस्यांना असावा सुरूवातीस ब्रिटिश सरकारने काँग्रेसचे महत्व कमी लेखले पण काँग्रेसच्या लोकप्रियतेने व त्यांच्या चळवळीमुळे ब्रिटिश सरकारने इ.स.1892 चा कायदा पास केला. हा कायदा भारतातील कायदेमंडळाची रचना, सत्ता व कार्य एवढ्यापुरताच मर्यादित होता

केंद्रीय कायदेमंडळात अतिरिक्त सदस्यांची संख्या 10 व जास्तीत जास्त 16 असावी तसेच कायदे मंडळात किमान 40 टक्के सदस्य गैरसरकारी असावे. त्यातील काही निवडून आलेले व काही नामनियुक्त राहणार होते. इ.स. 1892 च्या कायदा म्हणजे 1861 च्या कायद्यापासून विकासाचे टाकलेले पूढचे पाउल होते. हया कायद्याने कायदेमंडळाच्या कार्यांचा विकास करण्यात आला. सदस्य आता प्रश्न विचारु शकत होते. अंदाजपत्रकावर आपले विचार व्यक्त करण्याचा तसेच खर्चात वाढ अथवा कपात करण्याची सुचना करण्याचा अधिकार सदस्यांना मिळाला. कायद्यात असलेल्या निवडनुक पध्दतीचे तत्व स्पष्ट नसले तरी निहित होते आणि ती अत्यंत महत्वाची सवैधानिक बाब होती. प्रातिनिधिक शासन अजुन दुर असले तरी त्यादृष्टीने काहीना काही विकासाचे पाउल निश्चितच पडले होते.

1909 मोर्ले–मिंटो सुधारणा कायदा :

इ.स.1892 च्या कायद्याने कॉंग्रेसच्या मागण्या पूर्ण होउ शकल्या नाही, दरम्यानच्या काळात अनेक राष्ट्रवादी विचारवंतानी ब्रिटिश शासनाचे शोशक रुप उघडकीस आणून भारताच्या दारिद्रयाचे खरे कारण ब्रिटिश सरकारचे धोरण आहे हे सिध्द केले. त्यामुळे जनतेत ब्रिटिश सत्ते विरुध्द असंतोश वाढतच गेला. जहालवादाचा उदय, मुस्लिम लिगची स्थापना व सशस्त्र क्रांतिकारकांचा उदय यामुळे भारतमंत्री लॉर्ड मोर्ले व व्हाइसराय लॉर्ड मिंटो यांनी फेब्रु. 1909 मध्ये भारतीय कौन्सिल कायदा पास केला. त्यानुसार कायदेमंडळात सदस्यांची संख्या वाढुन 69 इतकी करण्यात आली. त्यात 37 सरकारी व 32 गैरसरकारी होते. या कायद्याने प्रांतिक कायदेमंडळाचा ही विस्तार लोक संख्येच्या आधारावर घडवून आणला प्रांतातील बिनसरकारी सदस्यांची संख्या ही प्रांतानुसार भिन्न होती. या कायद्याने निवडनुकीचे तत्व मान्य केले, या कायद्याने मुस्लिमांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले, त्यामुळे भारताच्या राजकारणात अनेक प्रश्न निर्माण झाले. हा कायदा भारतीयांच्या अपेक्षा पूर्ण करु शकला नाही त्यात अनेक दोश होते. कायदेमंडळात सदस्य संख्या जरी वाढली तरी सरकारी सदस्यांचे बहुतम होते. भारतात पार्लमेंट निर्माण करणे हा आपला अजिबात उद्देश नाही हे भारतमंत्री मोर्ले याने अधिच स्पष्ट केले होते.

इ.स.1919 चा मॉंटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा कायदा :

भारतातील आपली सत्ता अधिक काळ टिकविण्यासाठी ब्रिटिश सरकारने आतापर्यंत सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न केला होता. कार्यकारी मंडळात भारतीयांच्या प्रवेशाला ब्रिटिशांचा विरोध होता. तरी ही प्रांतीक शासनात भारतीयांना सामील करुन घेण्याचा निर्णय ब्रिटिश सरकारने घेतला त्याला अनेक कारणे होती. इ.स. 1909 च्या कायदयाने ब्रिटिश राजवटी विरुध्द भारतीयांचा असंतोश अधिकच वाढला. ब्रिटिश सरकारने भारतीयांची केलेली दडपशाही यामुळे ही असंतोशात भर पडली. इ.स. 1916 पासून भारतात अनेक घटना घडल्या टिळक मंडालेच्या तुरुंगातून सुटून आल्यानंतर त्यांनी चळवळीची सुत्रे आपल्या हाती घेतली. इ.स. 1916 च्या लखनौ अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यात घडुन आलेला समेट व कॉंग्रेस आणि मुस्लिम लिग यांच्यात झालेली युती ब्रिटिश सरकारला शह देणारी ठरली. लो. टिळक व ॲनी बेझंट यांनी देशात होमरुल चळवळ सुरु केली. सरकारने चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यामुळे भारतीयांच्या असंतोशात भरच पडली. केंद्रीय कायदेमंडळातील 19 सदस्यांनाही गव्हर्नर जनरल कडे स्वराज्याची मागणी करणारे एक निवेदन पत्र सादर केले. या सर्व स्फोटक परिस्थितीमुळे भारतमंत्री मॉन्टेग्युने 20 ऑगस्ट 1917 रोजी भारताला जबाबदार राज्यपध्दती लागु करुन, त्याव्दारे स्वराज्याचे ध्येय साध्य करण्यात येईल व प्रशासनाच्या प्रत्येक क्षेत्रात भारतीयांना जास्तीत जासत सहभागी करुन घेण्यात येईल असे घोशीत केले ही घोशणा एका अर्थाने राष्ट्रीय सभेचा नैतिक विजय होता.

कायद्यातील तरतुदी :

या कायद्याव्दारे भारतमंत्र्याचे भारतातील कारभाराचे नियंत्रण कमी करण्यात आले. या कायद्यानुसार एक सदनी कायदेमंडळाच्या जागी केंद्रामध्ये व्दिगृही कायदेमंडळ स्थापन करण्यात आले. राज्यसभा हे वरिश्ठ गृह त्यामध्ये 60 सदस्य होते त्यात 26 सदस्य सरकारी व 34 सदस्य निर्वाचित होते. विधीमंडळ हे कनिश्ठ गृह असून त्याची सदस्य संख्या 145 होती सरकार नियुक्त 41 व निर्वाचित 104 होते. गव्हर्नर जनरलला फार मोठे व्यापक व अंतिम अधिकार देण्यात आले, कायदे विषयक सत्तेबाबतची सर्व सुत्रे त्याच्याच हाती होती.

1919 च्या कायद्याने प्रांतामध्ये काही प्रमाणात जबाबदार राज्यपध्दती आणण्याचा प्रयत्न केला गेला. प्रांतीक कायदे मंडळातील कार्यकारी मंडळात भारतीयांचा समावेश करण्यात आला. गव्हर्नरच्या अधिकाराखाली प्रांतामध्ये व्दिदल राज्य पध्दती लागु करण्यात आली. प्रांतीक खात्याचे राखीव व सोपीव अशा दोन भागात विभागणी करण्यात आली. सोपीव या तुलनात्मक दृष्टया दुयम महत्वाचा खात्याचा कारभार लोकप्रतिनिधी कडे सोपविण्यात आला. केंद्रातील कायदेमंडळ जरी व्दिगृही बनले असे तरी प्रांतातील कायदेमंडळ मात्र एक गृहीच ठेवण्यात आले.

SPECIAL ISSUE Vol. II | Feb. 2019 | ISSN 2394-7632 | EISSN 2394-7640 (IMPACT FACTOR- 5.98)
SCHOLARS IMPACT An International Multidisciplinary Multilingual Refereed Journal
Shri Shivaji College, Parbhani 16th February 2019
▪National Conference Souvenir

प्रांतातील शांतता व सुव्यवस्था यासाठी कायदे करण्याचा अधिकार प्रांतिक कायदेमंडळाला देण्यात आला पण त्या
अधिकारावर काही मर्यादा घालण्यात आल्या.

1919 चा कायदा भारताच्या घटनात्मक व राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासातील महत्वाचा टप्पा होता. या
कायदयात मुख्य तीन दोश होते. एक केंद्रात आर्थिक स्वरूपातही जबाबदार शासन नव्हते दोन स्वतंत्र मतदार
संघाना मिळालेली बळकटी स्वशासनाच्या विकासातील गंभीर अडथळा होता. तीन प्रांतात लागु करण्यात आलेली
दुहेरी शासन पध्दती गुंतागुंतीची होती. सत्तेच्या हस्तांतरणाचे पाउल खुपच क्षीण व मर्यादित होते.

इ.स.1935 च्या भारत सरकारचा कायदा :

इ.स.1919 च्या कायद्याचे वर्णन काँग्रेसने अपुरे असमाधानकारक व निराशाजनक असे केले. एकुण
भारतातील वातावरण त्यावेळी इंग्रज विरोधी बनले. पुढे इ.स. 1919 च्या कायद्याची चौकट कायम ठेवण्याचा मुद्दा
समितीचा आग्रह सायमन कमिशन मधुन भारतीयांना वगळण्याचे ब्रिटिश सरकारचे धोरण व घटना तयार करण्याचे
लॉर्ड बरकनहेड आव्हान त्यातुन नेहरू अहवालाचा जन्म झाला. संघराज्य, संपुर्ण जबाबदार राज्य पध्दती, मुस्लिम
स्वतंत्र मतदार संघ इत्यादी विशेशांनी युक्त अशा घटनेचा आराखडा सर्वसंमत होऊ शकला नाही. भारतीयांच्या
बाजुनी सर्वसंमत घटना तयार करण्याचा प्रयत्न वाया गेला, यानंतर तीन गोलमेज परिशदा घेउन ब्रिटिश सरकारने
हाच प्रयत्न केला पण भारतातील विविध गटात एकमत होउ शकले नाही. तसेच काँग्रेसने कायदेभंग चळवळ सुरू
करून राष्ट्रीय सभेने तीन पैकी दोन गोलमेज परिशदेवर बहिश्कार घातला यातुनही मार्ग निघाला नाही. त्यामुळे
ब्रिटिश सरकारनी जातीय निवाडा जाहिर केला त्यामुळे गांधीजीनी अस्पृश्यांना देण्यात आलेल्या स्वतंत्र मतदार संघा
विरुध्द आमरण उपोशण सुरू केले, त्यामुळे गांधी–आंबेडकर यांच्यात पुणे कराराव्दारे तडजोड करण्यात येऊन तीन
गोलमेज परिशदेमधील चर्चेवर आधारीत ब्रिटिश सरकारने एक श्वेतपत्रिका काढली, त्यावर आधारीत असा 1935 चा
कायदा संमत करण्यात आला.

इ.स. 1935 च्या कायद्यातील तरतुदी :

इ.स. 1935 च्या कायद्याने भारतीय संस्थाने व ब्रिटिश भारत यांचे एकत्रित संघराज्य तयार करण्याची
योजना मांडली प्रत्यक्षात संस्थाने यामध्ये सामील झाली नाही. इ.स.1935 च्या कायद्यानुसार राज्यकारभाराच्या
खात्याची विभागणी तीन गटात करण्यात आली मध्यवर्ती सरकारची खाती, प्रांतीक सरकारची खाती व संयुक्त
अधिकाराची खाती.

मध्यवर्ती कायदेमंडळ व्दिगृही राहणार होते. राज्यसभा हे वरिश्ठ गृह व संघराज्य परिशद हे कनिष्ठ
सभागृह संपुर्ण देशासाठी व प्रसंगी प्रांतासाठी कायदे करण्याचा अधिकार मध्यवर्ती कायदेमंडळाला होता. कनिष्ठ
गृहाला जास्त अधिकार होते. मंत्र्यावर अविश्वास ठराव संमत करणे, प्रश्न विचारणे, चर्चा करणे, अंदाजपत्रक मंजुर
करणे, इ. इ.स. 1935 च्या कायद्याने, केंद्रामध्ये व्दिदल राज्य पध्दती येऊनही कारभारावरील गव्हर्नर जनरलचे
वचस्व पुर्वी एवढेच होते.

इ.स. 1935 च्या कायद्याने प्रांताना स्वायतत्ता देण्यात आली. ब्रिटिश सरकारने व मध्यवर्ती सरकारने
प्रांताच्या कारभारात हस्तक्षेप करू नये अशी कल्पना होती. काही प्रांत व्दिगृही तर काही एक गृही राहणार होते
व्दिगृही कायदे मंडळात वरिश्ठ सभागृह होते प्रांतीक कायदे मंडळातील सदस्य प्रत्यक्ष निवडणुकीव्दारे निवडून
आलेले असावीत अशी तरतुद होती. निवडणुकीच्या संदर्भात जातीय निवाडा व पुणे करार प्रांतात पाळला जाणार
होता.

इ.स. 1935 च्या कायद्याने प्रांतातील व्दिदल पध्दती नष्ट करून प्रांताना पुर्ण जबाबदारीचे तत्व लागु
करण्यात आले. प्रांतातील सर्व मंत्री लोकनियुक्त असणार होते. बहुमत पक्षाच्या सदस्यातुन गव्हर्नर मुख्यमंत्री
निवडणार होता. पण इ.स. 1935 च्या कायद्याने प्रांतीक स्वायतत्ता आली असली तरी प्रांता बाबत निर्णायक व अंतिम
सत्ता गर्व्हनरचीच असणार होती.

1935 च्या कायद्यामध्ये काही दोश होते. गव्हर्नर जनरलच्या विशेश अधिकारामुळे प्रांताना पुर्ण स्वायतत्ता
मिळणे शक्य नव्हते. प्रांतातील व्दिदल पध्दती मध्ये जे दोश होते तेच केंद्रातील व्दिदल पध्दतीत जाणवणार होते
स्वतंत्र मतदार संघाच्या तरतुदीमुळे जनमत विभागले जाणार होते.

घटना समिती व राज्य घटनेची निर्मिती :

ब्रिटिश सत्ते पासून भारताच्या स्वातंत्र्य प्राप्ती पर्यंत भारताची घटनात्मक वाटचाल टप्या टप्याने होत गेली. ब्रिटिशांनी स्वतःच्या फायद्यासाठी सत्तेचे जास्तीत जास्त केंद्रीकरण केले. परंतु भारतीयांच्या वैचारिक जागृतीतून भारतात लोकशाही रूजली व पुढे घटना निर्मितीची मागणी जोर धरू लागली.

इ.स. 1942 मध्ये क्रिप्स मिशनव्दारे ब्रिटिश सरकारने प्रथमच भारतीयांचा घटनासमितीचा हक्क मान्य केला. इ.स. 1946 मध्ये घटना समितीच्या निवडनुका होउन घटना समिती स्थापन करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली घटना मसुदा समितीने 21 फेब्रु. 1948 रोजी आपला अहवाल घटना समितीला सादर केला. भारतीय प्रजासत्ताकाचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची एक मताने निवड करण्यात आली 26 जाने. 1950 रोजी जगातील सर्वात मोठी लिखीत राज्यघटना त्यामध्ये 22 प्रकरणे 395 कलम व 9 परिशिश्ठ आहेत ती भारतात अंमलात आली.

निष्कर्ष :

भारतामध्ये लोकशाही घटनेचा पाया ब्रिटिश काळात घातल्या गेला. संपुर्ण लोकशाहीची कल्पना ब्रिटिशांना साम्राज्याबाबत मान्य नव्हती. परंतु इंग्लंडचा आदर्श डोळयापुढे असणाऱ्या भारतीय नेत्याना लोकशाही पध्दतीची घटना लोकनियुक्त घटना समितीकडुनच होण्याची गरज जाणवू लागली. इ.स. 1946 मध्ये घटनासमिती अस्तित्वात येउन 26 जाने. 1950 रोजी भारतात भारताला राज्यघटना लागु झाली. देशातील निरनिराळया समाज घटकांनी व समुहानी आजच्या घडीला जी प्रगती साधली आहे त्यांना विकासाची जी संधी मिळाली आहे ती केवळ भारतीय राज्यघटनेमुळे व घटनेने स्विकारलेल्या संसदीय लोकशाहीमुळेच.

संदर्भ ग्रंथ सुची :

1. गर्गे, स.मा. कुलकर्णी, अ.रा. भारतीय राज्यघटनेचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1975.
2. ग्रोव्हर, बी.एल. बेल्हेकर, एन.के. आधुनिक भारताचा इतिहास, चंद, एस. आणि कंपनी लि. 2003.
3. डॉ. प्रभाकर देव, आधुनिक भारत, निर्मला प्रकाशन, नांदेड, 2017.
4- Gupta, D.C., Indian National Movement and Constitutional Development, Vikas Publishing House Pvt. Ltd., New Delhi, 1983. Fourth Revised edition.
5- Bipin Chandra, Mridula Mukharjee, Aditya Mukharjee, K.N. Panikar, Sucheta Mahajan, India"s Struggle for Independence, Penuin, UK, 09 August, 2016.